


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे ● वर्ष : ०६ ● अंक : २६१ ● गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ ● किंमत : ३ रूपये ● पाने : ४







# ठाकरे बंधूंच्या युतीवर शिक्कामोर्तब !

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील महापालिकांची निवडणूक जाहीर झालेली आहे. या महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. गेल्या काही दिवसांपासून शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरू होत्या. त्यानंतर अखेर आज उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीची अधिकृत घोषणा केली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, की आज आम्ही आमचं कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोत. मी मागेच सांगितलं होतं की आम्ही एकत्र आलो आहोत, ते एकत्र राहण्यासाठी. मी सर्वांना सांगतो की यापुढे मुंबईवरती आणि महाराष्ट्रावर कोणी वाकड्या नजरेनं पाहिलं किंवा कपटी मनाने पाहिलं तर त्यांचा खात्मा केल्याशिवाय आम्ही राहणार नाही.



**राज ठाकरेंकडून ऐतिहासिक युतीची घोषणा**

मराठी माणसाने बलिदान देऊन मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली. त्याची आठवण आज होणं साहजिक आहे. आमच्या दोघांचेही आजोबा प्रबोधनकार हे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातल्या पहिल्या पाच सेनापतींमधले एक होते. माझे वडील बाळासाहेब ठाकरे, राजचे वडील श्रीकांत ठाकरे म्हणजे आख्खं ठाकरे घराणं मुंबईसाठी तेव्हा संघर्ष करत होता. त्यानंतरचा इतिहास मी तुम्हाला सांगत बसत नाही. पण महाराष्ट्राने मुंबई मिळवल्यावर मुंबईतच मराठी माणसाच्या उरावर उपरे नाचायला लागले आणि न्याय्य हक्कांसाठी बाळासाहेब ठाकरेंना शिवसेनेला जन्म घालावा लागला. मधली वर्षं व्यवस्थित गेली. पण आज पुन्हा एकदा मुंबईचे लचके तोडायचे मनसुबे दिल्लीतल्या दोघांचे आहेत. आत्ता जर आपण भांडत राहिलो, तर मुंबईतल्या हुतात्मा स्मारकाचा अपमान असेल. आज आम्ही आमचं कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

यापुढे मुंबईवर आणि महाराष्ट्रावर कुणीही वाकड्या नजरेनं किंवा कपटी कारस्थानांनी मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न करेल, त्याचा राजकारणात खात्मा केल्याशिवाय राहणार नाही ही शपथ घेऊन आम्ही मैदानात उतरलो आहोत.मी सगळ्या मराठी जनांना सांगतो, आता जर चुकाल, तर संपाल. आता फुटाल, तर पूर्णपणे संपून जाल. त्यामुळे तुटू नका, फुटू नका, मराठीचा वसा टाकू नका. मराठी माणूस सहसा कुणाच्या वाटेला जात नाही. पण त्याच्या वाटेला जर कुणी आलाच, तर त्याला परत जाऊ देत नाही, असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

राज ठाकरे म्हणाले, की मला बाकी जे बोलायचंय ते जाहीर सभांमधून बोलेन. मात्र, मी एका मुलाखतीत बोलताना म्हटलं होतं की, कोणत्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे आणि तिथून आम्ही एकत्र येण्याची सुरुवात झाली. कोण किती जागा लढवणार? आकडा काय? हे आम्ही तुम्हाला सांगणार नाही. महाराष्ट्रात सध्या लहान मुलं पळवणाऱ्या टोळ्या फिरतायत, त्यात दोन व्यक्ती समाविष्ट झाल्या आहेत. ते राजकीय पक्षांमधली मुलं पळवतात. जे निवडणुका लढवणार आहेत, त्या सर्व उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाईल. अर्ज कधी भरायचे वगैरे माहिती नंतर दिली जाईल. बरेच दिवस ज्याची प्रतीक्षा महाराष्ट्र करत होता, ती शिवसेना (ठाकरे) व मनसेची युती झाली हे आम्ही जाहीर करत आहोत, अशी घोषणा राज ठाकरे यांनी केली आहे.

> **ही दोन पक्षांची लढाई नाही तर ही मराठी माणसाची लढाई आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळेस जशी तत्कालीन माध्यमं मराठी माणसाच्या पाठीशी उभी राहिली तसं यावेळेस तुम्ही उभे रहा. कारण मराठी भाषा आणि मराठी माणूस टिकला तर तुमचं अस्तित्व टिकेल. सभांच्या वेळेस मराठी बांधव-भगिनींच्या दर्शनाचा योग येईलच. तोपर्यंत सर्वांना सस्नेह जय महाराष्ट्र, असे राज ठाकरे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.**

# जगताप यांचा राजीनामा

**राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष पद सोडले ; मनपा निवडणूक लढवण्याची घोषणा**



**पुणे : हॅलो प्रभात**

माजी महापौर प्रशांत जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या शहराध्यक्ष पदाचा आणि पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. पुणे येथे पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली.

बदलत्या राजकीय घडामोडींमध्ये कोणती भूमिका घ्यावी, याबाबत अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या घालमेलीमुळे सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून हा निर्णय घेतल्याचे जगताप यांनी सांगितले. या राजीनाम्याचे कोणतेही दूरगामी परिणाम नसून, त्यांना कोणताही राजकीय लाभ अपेक्षित नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पक्षाचे कार्यालय त्यांच्या नावावर असले तरी त्यावर आता त्यांचा कोणताही अधिकार नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रशांत जगताप यांनी आपण राजकारण आणि समाजकारण सोडणार नसल्याचे जाहीर केले. आगामी महानगरपालिका निवडणूक लढवणार असून, कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी आपण निवडणूक लढवत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाला अंधारात न ठेवता आपण बाहेर पडत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रशांत जगताप म्हणाले, 27 वर्षांपूर्वी मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले, तेव्हा कुठल्या पदासाठी नव्हे, तर पुरोगामी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी मी कार्यरत झालो. आज 27 वर्षांनंतरही हेच एकमेव ध्येय माझ्या मनात आहे. यापुढेही पुरोगामी विचारांसाठी माझी सामाजिक व राजकीय वाटचाल सुरूच असेल असे जगताप म्हणाले. आजपर्यंत अत्यंत निष्ठेने मला साथ देणाऱ्या, यापुढेही संघर्षाच्या वाटेवर माझ्यासोबत येणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार जगताप यांनी मानले.

## संक्षिप्त...

### इंदापूर साखर कारखान्याला दंड

**पुणे : हॅलो प्रभात**

इंदापूर तालुक्यातील राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याला नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी साखर आयुक्तालयाकडून मोठा आर्थिक दंड ठोठावण्यात आला आहे. आवश्यक परवानगी न घेता ऊस गाळप सुरू केल्याच्या कारणावरून संबंधित साखर कारखान्यावर तब्बल ११ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, या कारवाईमुळे साखर उद्योगात खळबळ उडाली आहे. गाळप हंगाम सुरू करण्यासाठी शासनाची परवानगी घेणे बंधनकारक असते. मात्र इंदापूरमधील या कारखान्याने नियमांची पूर्तता न करता थेट गाळप सुरू केले. याची गंभीर दखल घेत साखर आयुक्तालयाने तपास करून दंडात्मक कारवाईचा निर्णय घेतला. नियमांचे उल्लंघन करून गाळप केल्याने ऊसदर, शेतकऱ्यांचे हित आणि साखर उद्योगातील शिस्त यावर परिणाम होतो, असेही आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

### तडीपार गुंड मयूर शिंदे भाजपमध्ये

**ठाणे : हॅलो प्रभात**

ठाणे महापालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भाजपच्या एका निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर तडीपार करण्यात आलेल्या मयूर शिंदे याने भारतीय जनता पक्षात प्रवेश केला असून, त्याला सावरकरनगर वॉर्डमधून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घडामोडीमुळे ठाण्यातील राजकारण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. मयूर शिंदे हा ठाणे आणि मुंबई परिसरात गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे चर्चेत राहिलेला व्यक्ती आहे. त्याच्यावर खंडणी, मारहाण, धमकी तसेच इतर गंभीर गुन्ह्यांचे आरोप असून, पोलिसांनी त्याला यापूर्वी तडीपार केले होते. खासदार संजय राऊत यांना धमकी दिल्याच्या प्रकरणातही त्याचे नाव पुढे आले होते, त्यामुळे तो अधिक वादग्रस्त ठरला होता.

### आचारसंहितेमुळे लॉटरी लांबणीवर

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाची (म्हाडा) बहुप्रतीक्षित घरांची लॉटरी पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेमुळे राज्यात लागू झालेल्या आचारसंहितेचा फटका म्हाडा लॉटरीलाही बसला असून, त्यामुळे नियोजित तारखेला सोडत होऊ शकलेली नाही. यामुळे हजारो अर्जदारांना आता आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. म्हाडामार्फत पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील एकूण ४ हजार १८६ घरांसाठी लॉटरी जाहीर करण्यात आली होती. या लॉटरीसाठी दोन लाखांहून अधिक नागरिकांनी अर्ज केले होते. सुरुवातीला ही सोडत डिसेंबर महिन्यात होणार होती. मात्र, अर्जांची छाननी, हरकती-आक्षेपांची प्रक्रिया आणि त्यानंतर लागू झालेली आचारसंहिता यामुळे लॉटरीचा कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हाडा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आचारसंहिता लागू असताना अशा प्रकारच्या योजनांबाबत निर्णय घेता येत नाही. त्यामुळे सध्या लॉटरीची निश्चित तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. आचारसंहिता संपल्यानंतर सर्व प्रक्रिया पूर्ण करून लॉटरी काढली जाईल, असे म्हाडाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



# अनंत चव्हाण यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**पुणे : हॅलो प्रभात**

आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक युवक संघाचे प्रदेशाध्यक्ष अनंत(बापू) चव्हाण यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस(अप)गटात प्रवेश केला.चव्हाण हे गेल्या अनेक वर्षापासून आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक युवक संघाच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत असताना संघाच्या माध्यमातून अनेक बेरोजगार तरुणांना नोकरीसह उद्योगाच्या संधी उपलब्ध करून दिल्याने त्यांचे करत असलेले कार्य पाहून महाराष्ट्र राज्य खो_खो संघाचे प्रशिक्षक संजय बोडरे यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांना यश आले आहे. चव्हाण यांनी केलेल्या प्रवेशामुळे पक्षाची ताकद वाढण्यास अधिक मदत मिळणार असून त्यांनी केलेल्या प्रवेशामुळे सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यकाळात पुणे शहरातच नव्हे तर जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

# राष्ट्रीय समाज पक्ष व काँग्रेस महापालिका एकत्र लढणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील नगरपालिका निवडणुकीनंतर होत असलेल्या महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष सज्ज असून नगरपालिका निवडणुकाप्रमाणेच या निवडणुकीतही समविचारी पक्षांना सोबत घेण्याची काँग्रेसची भूमिका आहे. महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस व राष्ट्रीय समाज पक्ष एकत्र लढणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केले. टिळक भवन येथे आज राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यात आघाडीबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी पत्रकार परिषदेत आघाडीची घोषणा केली. यावेळी पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, महादेव जानकर हे बहुजन समाजाचा आश्वासक आवाज आहेत. देशात लोकशाही व संविधान पायदळी तुडवण्याचे काम भारतीय जनता पक्ष करत आहे अशा प्रसंगी समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लढण्याचा निर्णय झाला आहे. नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत आघाडीची औपचारिक घोषणा केलेली नव्हती पण सातारा, सांगली तसेच मराठवाडा व विदर्भात एकत्र निवडणुका लढलो आहोत आणि तीच भूमिका आज पुढे घेऊन जात आगामी काळात सोबत राहण्याचा निर्णय झाला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यावेळी म्हणाले की, शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार घेऊन काम करत असताना समविचारी पक्षांनी एकत्र असावे या भावनेतून लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची दिल्लीत भेट घेतली होती. काँग्रेसबरोबर रासपची आघाडी ३१ मे रोजीच झाली आहे. राहुल गांधी हे देशातील तरुण, महिला, आदिवासी, गोरगरीब, मागासवर्गीय यांचा आवाज बनून काम करत आहेत. जागा किती मिळणार यापेक्षा आजघडीला संविधान व लोकशाही वाचवण्याची नितांत गरज आहे तसेच सामान्य लोकांना मान सन्मान मिळाला पाहिजे, असे जानकर म्हणाले.



**जानकर व सपकाळ यांची घोषणा**

# ठाकरेंची युती म्हणजे जणू काही पुतिन-झेलेन्स्कीच एकत्र

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

**मुंबई: हॅलो प्रभात**

राज्यातील महापालिकांची निवडणूक जाहीर झालेली आहे. या महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. गेल्या काही दिवसांपासून शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरू होत्या. त्यानंतर अखेर आज उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीची अधिकृत घोषणा केली आहे. याबाबत आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले आहेत याचा मला आनंद आहे. पण ते एकत्र आल्याने राजकीयदृष्ट्या फार काहीतरी घडेल असा जर कुणाचा समज असेल तर तो बाळबोध समज आहे. माझ्यासमोर टीव्ही सुरु होता म्हणून बघत होतो. काही माध्यमं असं दाखवत होती रशिया आणि युक्रेनचीच युती होते आहे. झेलेन्स्की निघाले, पुतिन निघाले



आणि युती झाली. मला वाटतं कुठल्याही पक्षाला अस्तित्व टिकवण्यासाठी जे करायचं असतं ते त्यांनी केलं. याने काही फार परिणाम होईल असं वाटत नाही. कारण मुंबईकरांचा विश्वासघात या मंडळींनी सातत्याने केला आहे, मराठी माणसाला मुंबईबाहेर घालवण्याचं काम आणि पाप यांनी केलं आहे. त्यामुळे मराठी माणूस त्यांच्या बरोबर नाही. तर ज्यांच्यावर यांनी हल्ले केले असे अमराठीही यांच्याबरोबर नाहीत. मुंबईत कुणीही यांच्या सोबत येणार नाही. यांचा ट्रॅक रेकॉर्ड भ्रष्टाचार आणि स्वहिताचा आहे.भावनिक बोलण्याचा आता जनता विचार करत नाही. मुंबईकर महायुतीचं काम बघून , मुंबईचा विकास बघून मतं देतील. विशेषतः मराठी माणसाला मुंबईत घरं देण्याचा कार्यक्रम महायुतीने सुरु केला आहे. त्यामुळे मुंबईकर महायुतीच्या पाठिशी उभे राहतील.आकड्यांशी माझा काही संबंध नाही, त्यांच्या मनात काय आकडे आहेत? ते कुठे आकडे लावत आहेत? मला माहीत नाही त्यात मला रसही नाही. ज्या प्रकारे ही पत्रकार परिषद झाली आणि जो हाईप तयार केला होता खोदा पहाड और चुहाँ भी नहीं निकला. त्यांनी (ठाकरे बंधू) लक्षात ठेवावं ते म्हणजे मुंबई नाहीत, ते म्हणजे मराठी नाहीत, ते म्हणजे सगळं काही असा जो त्यांचा गर्व आहे त्यामुळेच मुंबईकर त्यांच्यापासून दूर गेलेत. मुंबईकरांना सेवेकरी हवे आहेत. उद्धव ठाकरेंनी स्क्रिप्ट बदलली पाहिजे. अनेक वर्षे एकच गोष्ट बोलत आहेत. त्यांना २५ वर्षांचा हिशोब द्यावा लागेल पण ते बोलणार नाहीत, असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## संपादकीय

# शिवसेनेचे वर्चस्वही आता भाजप मोडीत काढत आहे

गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीचा निकाल हा अपेक्षेप्रमाणेच लागला. विधानसभा निवडणुकीतील कल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही कायम राहिला असून महायुतीने भरघोस यश मिळवित महाविकास आघाडीचा पुन्हा एकदा सुपडासाफ केला. महायुतीने विधानसभेप्रमाणेच नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीतही घवघवीत यश मिळवत आपली जादू कायम ठेवली आहे. शिवसेनेच्या छायेत वाढलेल्या भाजपने आता शिवसेनेलाही मागे टाकत आपणच महाराष्ट्राच्या राजकारणातील 'धुरंधर' असल्याचे दाखवून दिले आहे. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला महाराष्ट्राचा ग्रामीण भाग आता भाजपचा बालेकिल्ला बनू लागल्याचे विधानसभा व ताज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसून आले आहे. तसेच महाराष्ट्राच्या शहरी भागात असलेले एकत्रित शिवसेनेचे वर्चस्वही आता भाजप मोडीत काढत असल्याचे चित्र आहे. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही राज्यात भाजपच पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. राज्यात भाजपचे १२९ उमेदवार नगराध्यक्षपदी विराजमान झाले. महायुतीचे घटकपक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाचे ५८, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे ३७ नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. राज्यातील २८८ नगरपालिकांच्या निवडणुकीत महायुतीचा वरचष्मा राहिला असून, त्यांनी तब्बल २१३ नगरपालिकांमध्ये थेट नगराध्यक्ष निवडून आणण्यात यश मिळवले आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडीला नगरपालिका निवडणुकीत अर्धशतकापर्यंतच मजल मारता आली आहे. लोकसभा निवडणुकीत दिसून आलेला महाविकास आघाडीचा करिष्मा राज्यात आता पूर्णत: ओसरला असल्याचे ताज्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेसचे राज्याच्या ग्रामीण भागात दीर्घकाळ वर्चस्व होते. पण आता ग्रामीण भागातीलही काँग्रेसचे बालेकिल्ले ढासळू लागले आहेत. एकेकाळी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण भागात तळागाळात मजबूत पकड असलेली काँग्रेसला महायुतीने विशेषत: भाजपने चांगलाच धक्का दिला आहे. सहकार क्षेत्रातही भाजपने आपली पाळेमुळे रोवायला सुरुवात केल्याचे दिसून येत आहे.

भाजपने एकत्रित शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडल्यानंतर या दोन्ही पक्षांचे सत्तेतील भागीदार बनलेले नेते एकनाथ शिंदे व अजित पवार यांनाही या निवडणुकीत बऱ्यापैकी यश मिळाले. मात्र, शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी शरद पवार गटाची विधानसभेपासून सुरू असलेली वाताहत अद्याप थांबली नसल्याचे दिसत आहे. ताज्या निकालामुळे या दोन्ही पक्षांमध्ये सुरू असलेली गळती आता अधिकच तीव्र होण्याची शक्यता आहे. जानेवारीत होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीत याचा मोठा फटका या पक्षांना बसण्याची शक्यता आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या पश्चिम महाराष्ट्रातही या पक्षाला यावेळी फारसे यश मिळू शकले नाही. शरद पवार यांच्या राजकीय चाली दिवसेंदिवस निष्प्रभ होत असल्याचे सध्या चित्र आहे. भाजपच्या रणनीतीपुढे शरद पवार यांची राष्ट्रवादी व उद्धव ठाकरे यांची शिवसेना टिकाव धरू शकलेली नाही.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना पूर्वी कुणी फारसे महत्त्व देत नसत. विविध राजकीय पक्षांचे स्थानिक नेतृत्व स्थानिक राजकीय गणितानुसार युती, आघाडी करून या निवडणुका लढवत असत. यावेळी प्रथमच निवडणुकांना महत्त्व प्राप्त झाल्याचे चित्र दिसून आले. आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व पालिका निवडणुका रखडल्यामुळे यावेळी या निवडणुका सर्वच पक्षांनी गंभीरपणे घेत आपल्या ताकदीची चाचपणी केली.

या निवडणुकीत महायुतीतील घटकपक्षांनी काही ठिकाणी युती तर काही ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढवली होती. भाजपने विदर्भातील १०० नगरपालिकांपैकी ५८ ठिकाणी विजय मिळवला. एकेकाळी विदर्भ हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जायचा, मात्र आता या बालेकिल्ल्याला तडे गेले असून काँग्रेसला केवळ २३ ठिकाणी यश मिळाले. विदर्भात शिंदेंच्या शिवसेनेने ८, अजितदादांच्या राष्ट्रवादीने ७ जागांवर विजय मिळवला, तर ठाकरेंच्या शिवसेनेला आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला विदर्भात भोपळाही फोडता आला नाही.

मराठवाड्यातील ५२ नगरपालिकांपैकी भाजपने सर्वाधिक २५ जागा जिंकल्या. शिंदेंच्या शिवसेनेला ८, अजितदादांच्या राष्ट्रवादीला ६ ठिकाणी नगराध्यक्षपद मिळवता आले. दुसरीकडे 'मविआ'तील घटपक्ष असलेल्या काँग्रेसला केवळ ४, शिवसेना ठाकरे गटाला ४ व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला केवळ २ ठिकाणी नगराध्यक्षपद मिळविण्यात यश आले. उत्तर महाराष्ट्रातील ४९ नगरपालिकांपैकी भाजपला सर्वाधिक १८ ठिकाणी आपले नगराध्यक्ष निवडून आणण्यात यश मिळाले. शिंदेंच्या शिवसेनेला ११, अजितदादांच्या राष्ट्रवादीला ७ ठिकाणी यश मिळाले, तर काँग्रेसचे ५, शिवसेना ठाकरे पक्षाचे २, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा १ नगराध्यक्ष निवडून आला.

राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील ६० नगरपालिकांपैकी सर्वाधिक १९ ठिकाणी भाजपचे नगराध्यक्ष निवडून आले. शिंदेंच्या शिवसेनेचे आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीचे प्रत्येकी १४ नगराध्यक्ष विजयी झाले. काँग्रेसला केवळ ३, शिवसेना ठाकरे पक्षाला १, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला ३ ठिकाणी नगराध्यक्षपद मिळवता आले. कोकणातील २७ नगरपालिकांपैकी सर्वाधिक १० ठिकाणी शिंदेंच्या शिवसेनेला यश मिळाले. त्याखालोखाल भाजपला ९, शिवसेना ठाकरे पक्षाला २, राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना प्रत्येकी १ नगराध्यक्ष निवडून आणता आला. राज्यातील २८८ थेट नगराध्यक्ष आणि सुमारे ६ हजार २०० हून अधिक नगरसेवकपदासाठी झालेल्या या निवडणुकीत महायुतीतील भाजपचे सर्वाधिक १२९ नगराध्यक्ष व ३,३२५ नगरसेवक निवडून आले. २०१७ च्या तुलनेत भाजपचे संख्याबळ यंदा जवळपास दुपटीने वाढले आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे ६९५ नगरसेवक, तर राष्ट्रवादीचे ३११ नगरसेवक विजयी झाले आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीतील काँग्रेसचे १३०० हून अधिक तर शिवसेना ठाकरे पक्षाचे ३७८ नगरसेवक निवडून आले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे १५३ नगरसेवक निवडून आले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा राज्यभरातील कल पाहता भाजप राज्याच्या कानाकोपऱ्यात चांगलीच रुजली असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच ठाकरे नावाचे वलय नसतानाही एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने आपले नाणे खणखणीत वाजवले आहे, तर शरद पवारांच्या सावलीतून बाहेर पडत अजित पवार यांनीही आपला सवतासुभा चांगलाच जमवला असल्याचे चित्र आहे. यापूर्वी शिवसेनेतून बाहेर पडलेले नेते छगन भुजबळ, नारायण राणे, गणेश नाईक, राज ठाकरे यांचा अपवाद वगळता अन्य नेते राजकारणातून बाहेर फेकले गेल्याचे चित्र होते. मात्र, एकनाथ शिंदे यांनी बंडानंतर मूळ पक्ष काबीज करीत ठाकरे नावाचे वलय नसतानाही चांगलेच यश मिळवल्याने 'ठाकरे' नावातील करिष्मा ओसरला का, असा प्रश्न आता सर्वांना पडला आहे. लोकसभेतील अपयशानंतर धडा घेत लाडक्या बहिणींना वश करण्याचा महायुतीचा फंडा विधानसभेत चांगलाच यशस्वी झाला. या योजनेमुळे 'मविआ'ची सुरू झालेली वाताहत संपण्याची शक्यता सध्या तरी दिसत नाही. त्यामुळे आर्थिक ओढाताण होत असतानाही 'लाडकी बहीण' योजना महायुतीने कशीबशी सुरूच ठेवली आहे. त्याचे रसरशीत फळ महायुतीला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मिळाले आहे. त्यामुळे हा ट्रेंड महापालिका निवडणुकीतही कायम राहील.

# पुण्यात 'आप' स्वबळावर?

## दिल्ली-पंजाबचे विकास मॉडेल महाराष्ट्रात राबवणार

**पुणे : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रातील प्रस्थापित राजकीय पक्षांनी विचारधारा विसरून सामान्य माणसाचा अपेक्षाभंग केला असून राज्यात भ्रष्टाचाराची परिसीमा गाठली गेली आहे, अशी टीका करत आम आदमी पार्टी (आप) ने आगामी पुणे महानगरपालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे.

'आप'चे प्रभारी आणि दिल्लीचे माजी आमदार प्रकाश जरवाल यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, दिल्ली आणि पंजाबमधील विकासाचे मॉडेल महाराष्ट्रात राबवून शाळा, दवाखाने, वाहतूक आणि रोजगाराचे सक्षमीकरण करणे हे पक्षाचे मुख्य धोरण असेल.

या पत्रकार परिषदेला राज्य प्रवक्ते मुकुंद किर्दत, शहर अध्यक्ष धनंजय बेनकर, सुदर्शन जगदाळे आणि पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष रविराज काळे उपस्थित होते. जरवाल म्हणाले की, आज कोणता नेता कोणासोबत आहे हे ओळखणे कठीण झाले आहे. निवडून आलेले अनेक नगरसेवक कोट्यधीश झाले, पण विकासाची गंगा सामान्य माणसापर्यंत पोहोचलेली नाही. या पार्श्वभूमीवर 'आप' प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या बळावर सर्व जागा लढवण्याचा प्रयत्न करणार आहे. निवडणुकीसाठी 'आप'ने आपली स्टार प्रचारक यादी जाहीर केली असून, यात राष्ट्रीय अध्यक्ष अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, माजी मुख्यमंत्री अतिशी, खासदार संजय सिंग आणि राखी बिडलान यांचा समावेश आहे. हे सर्व नेते लवकरच महाराष्ट्र दौऱ्यावर येऊन प्रचार करतील. पुणे महानगरपालिकेसाठी पक्षाने १६ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. आतापर्यंत एकूण ४१ उमेदवारांची नावे जाहीर करून 'आप'ने इतर पक्षांच्या तुलनेत आघाडी घेतली आहे. दुसऱ्या यादीत :आलिशा मुलानी, स्मिता सोंडे, माधुरी वडमारे, सचिन कंकाळ, अनिकेत गागडे, स्वप्नील गोरे, अरुण शिंदे, इरफान रोड्डे, शेखर ढगे, इक्बाल तांबोळी, पियूष हिंगणे, सुरज सोनवणे, प्रदीप उदागे, प्रतीक खोपडे, मालन नाडे आणि निखिल खंदारे. उमेदवारी देताना महिला, अनुसूचित जाती आणि सर्वसामान्य प्रवर्ग यांचा समतोल राखण्यात आला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा नगरपरिषद निवडणुकीत 'आप'च्या उमेदवार शालिनीताई सुखधान निवडून आल्याने पक्षाने महाराष्ट्रात स्वतःचे यश खाते उघडले, असे पक्षाचे कार्याध्यक्ष अजित फाटके पाटील यांनी नमूद केले. या यशानंतर आता सर्व महानगरपालिका ताकदीने लढवण्याचा निर्धार पक्षाने केला आहे.

## पत्की दुहेरी खून खटल्यातील आरोपींची अखेर १५ वर्षांनी निर्दोष मुक्तता

**पुणे : हॅलो प्रभात**

कर्वेनगर येथील पत्की दुहेरी खून खटल्यात सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्या आरोपींची उच्च न्यायालयाने अखेर १५ वर्षांनी निर्दोष मुक्तता केली. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश भारती चांडक व भारती डोंगरे यांनी हा निकाल दिला. आरोपी अंबादास श्रीपाद जाधव व सहकारी, बंटी उर्फ गौरव गौतम वडवेराव , पंड्या उर्फ पांडुरंग अतुल जाधव अशी निर्दोष मुक्तता झालेल्यांची नावे आहेत. पुण्यातील कर्वे नगर येथे घरामधे घुसून आरोपींनी स्मिता पत्की आणि सुलभा पाच्छापूरकर या दोन विवाहित महिलांना जीवे ठार मारून सोने लंपास केले होते. त्यावेळेस आरोपी सापडून येत नसल्याने गदारोळ झाला होता. या प्रकरणात आरोपींना काही महिन्यांनी अटक करण्यात आली. सरकार तर्फे १३ साक्षीदार तपासण्यात आले. यात सत्र न्यायालयाने आरोपींना जन्म ठेपेची शिक्षा दिली होती.



## श्री सयाजीनाथ महाराज विद्यालयात राष्ट्रीय गणित दिन साजरा

**पुणे : हॅलो प्रभात**

गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या वडमुखवाडी , येथील श्री सयाजीनाथ महाराज विद्यालयात राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री राजकुमार गायकवाड सर यांच्या हस्ते महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे विभाग प्रमुख तथा गणित विषय प्रमुख श्री नितीन वारखडे , विभाग प्रमुख सौ.नीलम नाईक, सौ.राणी पालेकर, श्री. राहुल ननवरे उपस्थित होते. गणित दिनाचे औचित्य साधून विद्यालयात गणित रांगोळी स्पर्धा, पाढे पाठांतर स्पर्धा, गणित प्रोजेक्ट प्रदर्शन, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धेमध्ये विद्यालयाचे विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. गणित प्रोजेक्ट च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गणित विषय समजून घ्यावा असे यावेळी प्राचार्य राजकुमार गायकवाड यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

गणित दिनानिमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार रामभाऊ मोझे,संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, संस्थेच्या सदस्या अलकाताई पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना गणित दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## लग्नाच्या दुसऱ्या दिवसापासून जोडपे झाले वेगळे

**पुणे : हॅलो प्रभात**

प्रेमविवाहानंतर आयुष्य खरंतर सुखकर व्हायला हवे. एकमेकांचे स्वभाव, आवडी निवडी आधीच माहिती असल्याने गोडीगुलाबीचा संसार व्हायला हवा. पण एका प्रेमविवाह केलेल्या दाम्पत्याच्या आयुष्यात झाले उलटेच. प्रेमविवाहानंतर दुसऱ्या दिवसापासून दोघांमध्ये वाद सुरू झाला अन् ते वेगळे राहू लागले. अखेर या उच्चशिक्षित दाम्पत्याचा घटस्फोट ८ दिवसांत मंजूर झाला. कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश बी. डी. कदम यांनी हा निकाल दिला आहे. दि. ३ डिसेंबरला दाखल केलेला दावा १० डिसेंबरला निकाली निघाला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यानुसार परस्पर संमतीने घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी दोघे १८ महिन्यांपासून वेगळे राहत असल्यास ६ महिन्यांचा कालावधी वगळता येतो. या प्रकरणात दोघे १८ महिन्यांपासून वेगळे राहत आहेत.

## मनसे-उबाठा एकत्र येणे ही तर ऐतिहासिक पराभवाची नांदी

### नवनाथ बन यांची टीका

**मुंबई : हॅलो प्रभात**

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे एकत्र येणे ही ऐतिहासिक पर्वाची नांदी नसून उबाठा आणि मनसेच्या ऐतिहासिक पराभवाची नांदी ठरेल, असा प्रहार भारतीय जनता पार्टीचे प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी बुधवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री.



बन बोलत होते. उद्धव ठाकरे काँग्रेस, शरद पवारांबरोबर गेल्यानंतर या दोन्ही पक्षांचे बारा वाजले हा इतिहास राज ठाकरेंनी विसरू नये. उबाठा बरोबर जाऊन राज ठाकरेंच्या वाट्यालाही पराभवाखेरीज काही येणार नाही, असेही श्री. बन यांनी सांगितले.

संजय राऊत यांना प्रत्युत्तर देताना श्री. बन म्हणाले की, उबाठा आणि मनसे सत्तेसाठी एकत्र येत आहेत, मुंबईसाठी नाही, मुंबईकरांसाठी नाही. उबाठा-मनसेची फक्त सत्तेच्या खुर्चीसाठी हातमिळवणी झाली आहे. या दोन्ही पक्षांचा विकासाचा अजेंडा नाही, फक्त सत्तेचा हिशेब डोक्यात ठेवूनच हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत. हे दोन पक्ष एकत्र येणं ही ताकद नाही तर या दोघांच्याही पराभवाची कबुली आहे, असा टोलाही श्री. बन यांनी लगावला.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना मेट्रो, कोस्टल रोड या सारखे सामान्य मुंबईकराच्या फायद्याचे प्रकल्प रोखले. मेट्रो, कोस्टल रोड थांबवून मुंबईकरांचा वेळ चोरला. या बद्दल त्यांनी मुंबईकरांची माफी मागितली पाहिजे. बीडीडी घरं महाग केली याचीही जबाबदारी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांनी स्वीकारली पाहिजे, असेही श्री. बन म्हणाले.

## अनंतराव पवार अभियांत्रिकीत जागरूकता कार्यक्रम

**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन स्टुडन्ट असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने थॅलेसिमिया या अनुवंशिक रक्तविकाराबद्दल व त्याच्या प्रतिबंध बाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी एक जागृती सत्र आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरवात श्रीमती मानसी ठाकूर,जिल्हा समन्वयक थालीसीमिया जागृती प्रकल्प जनकल्याण रक्तपेढी पुणे आणि डॉक्टर मुक्ता उमरजी सल्लागार



स्त्रीरोग तज्ञ, विभाग प्रमुख डॉ.अमर देशमुख, समन्वयक प्रा. प्राची आदमने यांचे उपस्थितीत झाली. श्रीमती मानसी ठाकूर यांनी थैलीसेमीया याविषयी माहिती देऊन आजाराची कारणे, लक्षणे प्रतिबंधात्मक उपाय घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. मुक्ता उमरजी यांनी लवकर निदान अनुवंशिक सल्ला आणि नियमित रक्त तपासणीचे महत्त्व सांगितले ज्यामुळे या विकाराचा प्रसार रोखता येतो रक्तदानाचे आणि विवाहपूर्व पूर्व चाचणीचे महत्त्व देखील त्यांनी अधोरेखित केले.

सदर कार्यक्रमासाठी मानसी ठाकूर, मुक्ता उमरजी डॉ.अमर देशमुख, प्रा. प्राची आदमने, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. प्रा. प्रियंका पतंगे यांनी आभार प्रदर्शन केले. महाविद्यालयाने या थॅलेसिमिया जागृती कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड, प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## लोहमार्ग ओलांडताना रेल्वेची धडक ; माय- लेकाचा मृत्यू

**पिंपरी : हॅलो प्रभात**

रेल्वे रूळ ओलांडताना रेल्वेच्या धडकेने माय-लेकाचा मृत्यू झाला. ही घटना कासारवाडी रेल्वे स्थानकावर रविवारी (दि.२१) रात्री दीडच्या सुमारास घडली. कविता अर्जुन चव्हाण (वय ३०) व आरव अर्जुन चव्हाण (४, दोघे रा. शिरोली, ता. खेड) असे अपघातात मृत्यू झालेल्या आई व मुलाचे नाव आहे. चव्हाण यांचे मूळ गाव अक्कलकोट असून काही वर्षांपूर्वी हे कुटुंब कामानिमित्त चाकण येथे आले. अर्जुन चव्हाण हे चाकण येथील एका खासगी कंपनीत कामाला आहेत तर, कविता या गृहिणी होत्या. चार दिवसांपूर्वी एका धार्मिक विधीसाठी हे कुटुंब मूळ गावी गेले होते. तेथून रेल्वेने परत येत असताना ते कासारवाडी रेल्वे स्थानकावर उतरले. कविता व आरव हे लोहमार्ग ओलांडत होते. त्याचवेळी रेल्वेच्या धडकेने दोघांचा मृत्यू झाला. रेल्वे स्थानकावर लोहमार्ग ओलांडण्यासाठी पुल असतानाही नागरिक आपला जीव धोक्यात घालत आहेत. पुलावरून जाण्याऐवजी न घाबरता थेट लोहमार्ग ओलांडून जाण्याचा प्रयत्न करत आहेत.

## रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत धनंजय बोडारे भाजपामध्ये

**मुंबई : हॅलो प्रभात**

उल्हसनगर नगरचे 'उबाठा' चे माजी उपमहापौर व माजी सभागृह नेते धनंजय बोडारे, माजी नगरसेविका वसुधा बोडारे, शीतल बोडारे, ओमी कलानी गटाचे माजी नगरसेवक नाना बिराडे यांनी बुधवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे स्वागत केले. आ. कुमार आयलानी, प्रदीप राजानी, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेश वडारिया, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी




यावेळी उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण म्हणाले की, धनंजय बोडारे हे झुंजार नेतृत्व असून त्यांच्याबरोबर अनेक वर्षे काम केले आहे. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्या विश्वासाने भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे त्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही.

# गुटख्याची विक्री झाल्यास निलंबन

## मंत्री नरहरी झिरवाळ यांचा इशारा

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यात बंदी असलेल्या गुटखा आणि तत्सम अमली पदार्थांवर कडक कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग सज्ज झाला आहे. या पुढे बंदी असलेले प्रतिबंधित पदार्थ सापडल्यास त्या संबंधित क्षेत्रातील अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना दिला आहे.

अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री होत आहे, असे निर्देशनाला आल्यास त्या कार्यक्षेत्राच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रकही मंत्री झिरवाळ यांच्या निर्देशानंतर काढण्यात आले आहे. या अंतर्गत सर्व विभागीय सह आयुक्त (अन्न) यांना प्रतिबंधित अन्नपदार्थांची छुप्या पध्दतीने व अवैध मार्गाने विक्री, साठा व वाहतूक करणाऱ्या व्यावसायिकावर प्रभावीपणे



कारवाई करण्याचे आदेश अन्न सुरक्षा आयुक्त श्रीधर दुबे पाटील यांनीही परिपत्रकाद्वारे दिले आहेत. झिरवाळ यांनी सहआयुक्तांना अन्न आस्थापनांची तपासणी करावी तसेच विक्री, साठा व वितरण होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, **स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे– ४११०४१. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर

हॅलो प्रभात

MY CITY ३

गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५

## ‘डिजिटल अरेस्ट’ फसवणूक; महिलेची १७ लाखांची हानी!

**पुणे : हॅलो प्रभात** : व्हिडिओ कॉलद्वारे अटक केल्याचा बनाव करून (डिजिटल अरेस्ट) सायबर चोरट्यांनी डेक्कन जिमखाना परिसरातील एका ज्येष्ठ महिलेची १७ लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत ज्येष्ठ महिलेने (वय ७९) डेक्कन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी १२ डिसेंबर रोजी तक्रारदार महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यांनी सुरुवातीला टेलिकॉम विभागातून बोलत असल्याचे सांगितले. त्यानंतर ‘तुमच्या बँक खात्याचा काळ्या पैशाच्या व्यवहारासाठी वापर झाला आहे. या प्रकरणात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) कारवाई करण्यात येणार आहे,’ अशी धमकी दिली. या प्रकरणात अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे भरावे लागतील, असे सांगून चोरट्यांनी महिलेवर मानसिक दबाव टाकला. त्यानंतर ज्येष्ठ महिलेने १२ ते १९ डिसेंबर या कालावधीत सायबर चोरट्यांनी सांगितलेल्या बँक खात्यांमध्ये १७ लाख रुपये जमा केले. रक्कम जमा झाल्यानंतर चोरट्यांनी मोबाईल बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच ज्येष्ठ महिलेने डेक्कन पोलिसांत तक्रार दिली. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीषा निंबाळकर करीत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे




### आबासाहेब काकडे महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिन संपन्न

**शेवगाव : हॅलो प्रभात**

अजय नजन

भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस 22 डिसेंबर राष्ट्रीय गणित दिन म्हणून संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आज राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य.संपत दसपुते, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी उपप्राचार्य श्री. अशोक तमनर व सर्व शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी गुणवत्ता चाचणीनुसार निवडलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे आयात ग्रुप, त्रिकोण ग्रुप, चौकोन ग्रुप, वर्तुळ ग्रुप असे ग्रुप करून त्यांच्यामध्ये प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या प्रश्नमंजुषेला सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला व गुणवंत विद्यार्थी कु. गरुड साक्षी विजय, कु. तमनर वैष्णवी बापू, कु. गोसावी अनुष्का अनिल, कु. दारकुंडे अपूर्वा सोमनाथ, कु. शिंगवी सम्यक गौतम, चि. खाटीक धनंजय दिलीप या गुणवंत विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी प्राध्यापिका सविता पवार यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या कार्याला उजाळा दिला. रामानुजन यांनी कमी वयातच गणितातील असामान्य प्रतिभा दाखवली. त्यांच्याकडे गणिताच्या प्रमेयांचा प्रचंड खजिना होता. त्यांच्या कामामुळे ते प्रसिद्ध झाले. त्यांचे आयुष्य कमी असले तरी त्यांचे गणित योगदान आजही संशोधकांना प्रेरणा देते. कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक तमनर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनातील गणिताचे महत्त्व समजावून देऊन मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक रविंद्र आगळे, सूत्रसंचालन अनिल जगताप तर समारोप वाघमारे मॅडम यांनी केला.




### मनपा निवडणूकीत ब्राह्मण समाजाचा प्राधान्याने विचार व्हावा

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे शहरात ब्राह्मण मतदारांची संख्या सुमारे १६ ते १८ टक्के असतानाही राजकीय पक्षांकडून ब्राह्मण उमेदवारांना डावलले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे येत्या पुणे महानगरपालिका निवडणुकीत ब्राह्मण समाजाला योग्य व पुरेसे प्रतिनिधित्व द्यावे, असे आवाहन सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आले. यावेळी समन्वयक भालचंद्र कुलकर्णी, सह-समन्वयक ॲड. ईशानी जोशी, प्रवक्ते विश्वजीत देशपांडे, राजकीय समिती सदस्य विश्वनाथ भालेराव, मंदार रेडे, मकरंद माणकीकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. अलीकडील नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांत राज्यभरातून अनेक ब्राह्मण उमेदवार निवडून आल्याचा दाखला देत, ब्राह्मण बहुल प्रभागांमध्ये उमेदवारीचा प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली.

# दोन्ही पवारांच्याही युतीची २६ डिसेंबरला घोषणा होणार

**दौंड : हॅलो प्रभात**

राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख राजकीय पक्षांच्या बदल्या भूमिका पाहायला मिळत आहेत. मुंबई महापालिका ठाकरेंच्या ताब्यात ठेवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. त्यासाठी काल दुपारी १२ वाजता अधिकृतपणे ठाकरे बंधूंच्या म्हणजेच मनसे - शिवसेना युतीची घोषणा झाली. त्यानंतर २६ डिसेंबर रोजी पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादी

देखील एकत्र येणार असल्याचं निश्चित झालं आहे. मुंबईसाठी ठाकरे तर पुण्यासाठी पवार एकत्र आल्याचं महापालिका निवडणुकांमुळे पाहायला मिळालं. ठाकरेंनंतर पुण्यात दोन



राष्ट्रवादी एकत्र येणार असून २६ डिसेंबर रोजी याची घोषणा होणार असल्याची माहिती स्वःत अजित पवारांनी दिली.

अजित पवार २६ तारखेला दोन्ही राष्ट्रवादीच्या अधिकृत युतीची घोषणा करणार आहेत, कार्यकर्त्यांना बोलताना अजित पवारांनी २६ तारखेला अधिकृत घोषणा करु असं सांगितलं. तसेच, कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, २६ तारखेला सगळ्या गोष्टी समोर येतील. कोण काय बोलतं यावर विश्वास ठेवू नका, असेही अजित पवारांनी कार्यकर्त्यांना उद्देशून म्हटले. दोन, राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेनंतर शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्या तर मी पक्षातून राजीनामा देईन, असा इशारा दिला होता. मात्र, जगताप यांच्या या इशाऱ्याने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसला फारसा फरक पडलेला दिसत नाही.

पुण्यात भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीचा प्रस्ताव... पुण्यात भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी सर्व पक्षांच्या आघाडीचा प्रस्ताव तयार केला जाणार आहे. त्यामध्ये दोन्ही राष्ट्रवादी हातमिळवणी करून ठाकरेंच्या शिवसेनेलाही सोबत घेणार असल्याची चर्चा सुरू आहे. अजित पवारांना याबाबत प्रस्ताव दिला जाणार असल्याची माहिती शशिकांत शिंदे यांनी दिली. त्यामुळे शशिकांत शिंदेंचा प्रस्ताव अजित पवार स्वीकारणार की नाही ? याकडे आता महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

## काँग्रेस : स्टार प्रचारकांची यादी जाहीर

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने तारीख जाहीर केली आहे. मुंबई, ठाण्यासह राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये मतदान १५ जानेवारीला पार पडेल, तर १६ जानेवारीला निकाल जाहीर होईल. या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. दरम्यान, राज्यातील २९ महानगरापालिकांच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने जय्यत तयारी केली आहे. आढावा बैठका व रणनितीवर सविस्तर चर्चा केल्यानंतर आता ४० स्टार प्रचारकांची यादी काँग्रेसने जाहीर केली आहे. स्टार प्रचारकांच्या यादीत प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार, खासदार छत्रपती शाहू महाराज, विधान परिषदेतील गटनेते आ. सतेज ऊर्फ बंटी पाटील, राष्ट्रीय सरचिटणीस खा.मुकुल वासनीक, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य बाळासाहेब थोरात, तेलंगणाचे मंत्री मोहम्मद अझरुद्दीन, खासदार रजनीताई पाटील, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभा खासदार इम्रान प्रतापगढी, राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे, अखिल भारतीय कार्य समितीचे सदस्य नसीम खान, अभिनेते व काँग्रेस नेते राज बब्बर, अखिल भारतीय कार्य समितीच्या सदस्या यशोमती ठाकूर, खासदार प्रणिती शिंदे, आमदार अमिन पटेल, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, माजी मंत्री सुनिल केदार, आ. अमित देशमुख, आ. डॉ. विश्वजित कदम, आमदार भाई जगताप, अनिस अहमद, माजी मंत्री रमेश बागवे, माजी खा. हुसेन दलवाई, आ. साजिद खान पठाण, कन्हैया कुमार, आमदार जिग्नेश मेवाणी, माजी मंत्री वसंत पुरके, माजी आ. मुजफ्फर हुसेन, एम.एम. शेख, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे व हनुमंत पवार यांचा या यादीत समावेश आहे.

## पुणे रेल्वेचे खाजगी जमिनीत अतिक्रमण?

- रेल्वेची जागा निश्चित करा ; शेतकऱ्यांचा पवित्रा
- दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्र

**दौंड : हॅलो प्रभात**

दौंड तहसील कार्यालयामध्ये बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दौंड तालुक्यातील प्रामुख्याने सहजपूर, बोरीबडक परिसरातील शेतकऱ्यांची रेल्वे संदर्भात मीटिंग आयोजित करण्यात आली होती, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) पार्टीच्या प्रवक्त्या वैशाली नागवडे, पंचायत समितीचे माजी उपसभापती सुशांत दरेकर, या मीटिंगसाठी खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या वतीने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक अध्यक्ष सचिन काळभोर तसेच अर्जदार सचिन भगत आणि शेकडो



शेतकरी उपस्थित होते. यावेळी नायब तहसीलदार देशमुख मॅडम, भुमिअभिलेखचे ताथवडकर, रेल्वेचे सीनियर सेक्शन इंजिनियर सुजित पगारे यांच्या समवेत सर्वांनी संवाद साधला आणि शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये सुरू असलेले रेल्वेचे काम तात्काळ थांबवण्याचे या बैठकीत ठरले, त्याचबरोबर भूमी अभिलेख यांच्याकडे रेल्वेने सर्व दौंड तालुक्यातील बाधित सर्वे नंबर गट नंबर यांची मोजणी करून रेल्वेची जागा निश्चित करावी आणि त्यानंतरच पुढील काम सुरू करावे असे या बैठकीत ठरले. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये हे काम झालेले आहे त्या ठिकाणी देखील शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून त्या ठिकाणी मोजणी करून जर ते रेल्वेचे अतिक्रमण असेल ते देखील काढण्यासंदर्भात चर्चा या ठिकाणी करण्यात आली. या बैठकीच्या शेवटी दौंड तालुक्याचे माजी आमदार रमेश थोरात आणि दौंड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष आप्पासाहेब पवार हे देखील यावेळी उपस्थित होते.

## दोन शून्य एकत्र येतात, तेव्हा बेरीजही शून्यच रहाते

### देवेंद्र फडणवीस यांची ठाकरे बंधूंवर टीका

**मुंबई : हॅलो प्रभात**

राजकारणात जेव्हा दोन शून्य एकत्र येतात, तेव्हा त्यांची बेरीजही शून्यच राहते. मुंबईकरांना आता शहर गाजवणारे नको, तर प्रामाणिकपणे सेवा करणारे सेवेकरी हवेत, अशा शब्दात देवेंद्र फडणवीसांनी युतीवर टीका केली.

शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी युतीची घोषणा केली. या युतीच्या घोषणेनंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत टोकदार आणि खोचक शब्दात टीका केली.

देवेंद्र फडणवीस यांनी नुकतंच प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भाष्य केले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले आहेत, याचा मला आनंद आहे. पण ते एकत्र आल्याने राजकीयदृष्ट्या फार काहीतरी घडेल असा जर कुणाचा समज असेल तर तो बाळबोध समज आहे.मला वाटतं कुठल्याही पक्षाला अस्तित्व टिकवण्यासाठी जे करायचं असतं ते त्यांनी केलं. याने काही फार परिणाम होईल असं वाटत नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ते पुढे म्हणाले , मुंबईकरांचा विश्वासघात या मंडळींनी सातत्याने केला आहे. मराठी माणसाला मुंबईबाहेर घालवण्याचं काम आणि पाप यांनी केलं आहे. त्यामुळे मराठी माणूस त्यांच्या बरोबर नाही. तर ज्यांच्यावर यांनी हल्ले केले असे अमराठीही यांच्याबरोबर नाहीत. मुंबईत कुणीही यांच्या सोबत येणार नाही. यांचा ट्रॅक रेकॉर्ड भ्रष्टाचार आणि स्वहिताचा आहे. आता जनता भावनिक बोलण्याचा विचार करत नाही. मुंबईकर महायुतीचं काम बघून, मुंबईचा विकास बघून मतं देतील. विशेषतः मराठी माणसाला मुंबईत घरं देण्याचा कार्यक्रम महायुतीने सुरु केला आहे. त्यामुळे मुंबईकर महायुतीच्या पाठिशी उभे राहतील, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

खोदा पहाड और चुहाँ भी नहीं निकला. त्यांनी लक्षात ठेवावं ते म्हणजे मुंबई नाहीत, ते म्हणजे मराठी नाहीत, ते म्हणजे सगळं काही असा जो त्यांचा गर्व आहे. त्यामुळेच मुंबईकर त्यांच्यापासून दूर गेलेत. मुंबईकरांना सेवेकरी हवे आहेत. उद्धव ठाकरेंनी स्क्रिप्ट बदलली पाहिजे. अनेक वर्षे एकच गोष्ट बोलत आहेत.

## स्वच्छ कोपरगांव सुंदर कोपरगांव मोहीम सुरू

### नगराध्यक्ष पराग संधान यांनी केली मोहीम सुरू

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन नगराध्यक्ष पराग संधान यांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव स्वच्छतेला नवी दिशा मिळणार आहे.कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर नगराध्यक्ष पराग संधान यांनी कोणताही विलंब न करता कामाला सुरुवात केली आहे.निवडणूक प्रचारादरम्यान नागरिकांना दिलेली आश्वासने लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासनासोबत समन्वय साधत ठोस पावले उचलली जात असून, जनतेने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,असे मत विवेकभैय्या कोल्हे आणि नगराध्यक्ष पराग संधान यांनी व्यक्त केले. तात्काळ कोपरगाव शहरातील स्वच्छता हा विषय प्राधान्याने हाती घेतला आहे. याच अनुषंगाने कोपरगाव नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या.शहर स्वच्छतेसाठी आवश्यक साहित्य व साधनांची कमतरता, ठेकेदारांकडून मिळणाऱ्या सुविधा, उपलब्ध वाहने तसेच कंत्राटी पद्धतीवर कार्यरत महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना किमान वेतन आयोगानुसार वेतन न मिळण्यासारख्या गंभीर प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. तुम्ही शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न सोडवा तुमचे प्रश्न आम्ही सोडवू हा विश्वास विवेकभैय्या कोल्हे यांनी दिला. या सर्व बाबींवर तातडीने उपाययोजना करण्यात येतील, तसेच स्वच्छता कर्मचारी बांधवांच्या हक्कांसाठी नगरपरिषद ठामपणे उभी राहील,असा विश्वास यावेळी देण्यात आला. नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी देखील नगराध्यक्षांच्या या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत असून, शहर स्वच्छतेसाठी नवे उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छ कोपरगांव सुंदर कोपरगांव या शहरव्यापी स्वच्छता मोहिमेचे आयोजन दिनांक २५ डिसेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. या मोहिमेत सामाजिक संस्था, विविध संघटना, व्यापारी, युवक मंडळे, महिला बचत गट तसेच शाळा व महाविद्यालयांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**या उपक्रमाअंतर्गत नागरिकांनी किमान एक तास शहर स्वच्छतेसाठी देत १ तास माझ्या कोपरगाव शहरासाठी ही महत्वपूर्ण मोहीम ठरणार आहे. चला, एकत्र येऊया आणि स्वच्छ, सुंदर कोपरगाव घडवूया, असा प्रेरणादायी संदेश नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिला.**

# आळंदी-हनुमानवाडीत बिबट्याचा वावर

### दुसऱ्यांदा परिसरात बिबट्याचे दर्शन; नागरिकांसह शेतकऱ्यांमध्ये धास्ती

**पुणे : हॅलो प्रभात**

श्री क्षेत्र आळंदी परिसरातील आळंदी-चाकण रोड भागातील दाट लोकवस्ती असलेल्या दुसऱ्यांदा हनुमानवाडी भागात बिबट्याने मोर्चा वळविल्याने या भागातील नागरिकांसह शेतकऱ्यांमध्ये धास्ती निर्माण होऊन भितीचे वातावरण पसरले आहे.



श्री क्षेत्र आळंदी परिसरातील खाजगी कंपन्यांचे जाळे पसरलेल्या चाकण भागाकडे मार्ग जात असल्याने या मार्गावर रात्र_दिवस वाहनांची असणारी वर्दळ मोठ्या प्रमाणात दिसून येत असली तरी पण या मार्गावरच केळगाव या गावची हनुमानवाडी लोकवस्ती असून परिसरात स्थानिकासह इतर भागातील नागरिक देखील मोठ्या प्रमाणात स्थायिक झाले आहेत.मात्र वसलेली वस्ती ही डोंगराळ(घाटाच्या) जवळ भागालगतच वसलेली असून दोन दिवसापूर्वी परिसरातील एका गुरांच्या गोठ्याजवळ मध्यरात्रीच्या सुमारास या मार्गालगतच असलेल्या गुरांच्या गोठ्याजवळ बिबट्या येऊन गेल्याची माहिती बुधवारी सकाळच्या सुमारास परिसरात वाऱ्यासारखी पसरताच या भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन नागरिकांमध्ये चर्चा रंगली होती. विशेष करून याच परिसरात महिनाभरापूर्वी रात्रीच्या सुमारास बिबट्याचे नागरिकांना दर्शन होऊन तो फिरत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी वनविभागास कळविल्यामुळे त्या बिबट्यास तात्काळ दुसऱ्या दिवशी जेरबंद करण्यास वनविभागास यश आले होते.या घटनेला महिना उलटत नाही तोच पुन्हा परिसरात बिबट्याने दर्शन दिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सध्या बिबट्याने ग्रामीण भागानंतर शहरी भागाकडे मोर्चा वळून यापूर्वी शहरातील औंध ,चऱ्होली,केसनंद,मांजरी,वाघोलीसह धानोरी भागातील मुंजबा वस्ती व लोहगाव आंतरराष्ट्रीय व विमानतळ परिसरात बिबट्याचे दर्शन सीसीटीव्हीत कैद झाल्याने शहरातील नागरिकांनी रात्रीच्या सुमारास घराबाहेर पडण्याची धास्ती घेतली होती. मात्र वनविभागाच्या वतीने त्यास लोहगाव विमानतळ परिसरात जेरबंद करण्यात आल्याने नागरिकांनी मोकळा श्वास घेतला होता.याबरोबरच पुणे-नगर रोडमार्गावरील खराडी भागात देखील अनेक नागरिकांना बिबट्याने कित्येकदा दर्शन दिल्याने खराडी पोलिस स्टेशनच्या वतीने गस्त घालून रात्रीच्या सुमारास नागरिकांनी घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात येत होते.या भागासह चऱ्होली,लोहगाव भाग बहुतांश प्रमाणात डोंगराने वेढला गेल्याने भक्ष्याच्या शोधार्थ बिबटे हे शहरी भागाकडे वळत असल्याचे बोलले जात आहे.तर चऱ्होली लोहगाव मार्गावर बिबट्यासह तरस या प्राण्यांचा वावर जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येत असून अनेकदा या मार्गावरून जाताना भागातील नागरिकांना तसेच वाहनचालकांनाअनेकदा तरस या प्राण्यांचे दर्शन घडून आले आहे.

त्यामुळे रात्रीच्या सुमारास कोणी वाहनचालक जात नसल्याचे दिसून येत आहे.सध्या परिसरात बिबट्याचा दिवसेदिवस वावर वाढत असल्याने शालेय विद्यार्थ्यांसह कामगार वर्गांना घराबाहेर पडणे अवघड झाले आहे.यापूर्वी बिबट्याकडून ग्रामीण भागात लहान मुलासह अनेक नागरिकांवर प्राणघातक हल्ले होऊन अनेक निष्पाप जीवांना झालेल्या हल्ल्यात जीव गमविण्याची वेळ आली आहे. बिबट्यांच्या वाढत्या घटनेमुळे ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलने करून संतप्त नागरिकांनी प्रशासनाची वाहने जाळण्याचा प्रकार दिड ते दोन महिन्यापूर्वीच घडला आहे.त्यामुळे दाट लोकवस्ती असलेल्या या परिसरात देखील नागरिकांसह बालकांचे जीव वाचण्यासाठी वनविभागाने योग्य ती उपाययोजना करून बिबट्यास तात्काळ जेरबंद करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

परिसरातील कोणत्या एखाद्या जनावरावर बिबट्याने हल्ला केला की,नाही याची माहिती मिळू शकली नाही.

तरी रात्री बिबट्या परिसरात आल्याची माहिती स्थानिक नागरिकांना समजताच नागरिकांनी सकाळच्या सुमारास डोंगराकडे धाव घेतल्याची माहिती समोर आली असून यासंदर्भात वन अधिकारी अनिल राठोड यांच्याकडे अधिक माहितीसाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.




## थोडक्यात पण महत्वाचे




### १४ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

**राहुरी : हॅलो प्रभात**

नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे २ आणि नगरसेवकपदाचे १२ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा पवार यांनी दिली. नगराध्यक्षपदासाठी रिंगणात राहिलेल्या बसपाच्या अश्विनी दोंदे आणि वंचितचे अॅड प्रसाद सांगळे यांचे डिपॉझिट जप्त झाले. नगरसेवक पदासाठी प्रभाग १ मधील आबासाहेब बापू कदम, ज्ञानदेव धोंडीराम तारडे; प्रभाग २ मधील प्रशांत बापूसाहेब कदम; प्रभाग ३ मधील शिवाजी रघुनाथ मुसमाडे; प्रभाग ४ मधील सविता रविंद्र सरोदे, कारभारी जगन्नाथ होले, शोभा बाळासाहेब कराळे; प्रभाग ६ मधील वसंतराव तान्हाजी कदम; प्रभाग ७ मधील अक्षय निवृत्ती पवार, राजेंद्र अशोक साळवे, कुसुमताई बबन निमसे आणि प्रभाग ९ मधील बापूसाहेब तुकाराम मुसमाडे यांची अनामत रक्कम जप्त झाली.

### प्रभाग ९ मध्ये राष्ट्रवादीचा झेंडा; संतोष जाधव यांचा अटीतटीच्या लढतीत विजय

**शेवगाव : हॅलो प्रभात**



शेवगाव नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ मधील अटीतटीच्या लढतीत राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार संतोष शरदराव जाधव यांनी भाजपचे अमोल सागडे यांचा अल्प मताधिक्याने पराभव करून नगरसेवकपदी विजय मिळवला. ही लढत शेवटच्या फेरीपर्यंत चुरशीची ठरली होती. मतमोजणीदरम्यान मतांचे अंतर सतत बदलत राहिल्याने तणावाचे वातावरण होते. निकाल जाहीर होताच राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. या विजयामुळे शहरातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होत असल्याचे मानले जात आहे. विजयानंतर बोलताना संतोष जाधव यांनी जनतेच्या विश्वासाबद्दल आभार मानत प्रभागाच्या विकासासाठी पक्षभेद न करता काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या विजयाबद्दल माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, माजी जि.प. अध्यक्षा राजश्री घुले पाटील, माजी आमदार नरेंद्र घुले पाटील, युवा नेते क्षितिज घुले पाटील यांच्यासह पक्ष पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

### आयटी पार्कनंतर आता आघाडीच्या उद्योगसमूहाची मोठी गुंतवणूक

**पुणे : हॅलो प्रभात**



पुणे परिसराचा वेगाने विस्तार होत आहे. त्यात पुरंदर हे अग्रस्थानी असून, तिथे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित आहे. याचबरोबर माहिती तंत्रज्ञान (आयटी) पार्कही प्रस्तावित आहे. अंतर्गत आणि बाह्य वर्तुळाकार मार्गांनी पुरंदर जोडले जाणार आहे. यामुळे भविष्यात पुरंदरला मोठे महत्व येणार आहे. हे लक्षात घेऊन देशातील आघाडीच्या शापूरजी पालनजी ग्रुपने पुरंदरमध्ये गुंतवणुकीची घोषणा केली आहे.

## आदिनाथ ढाकणे यांची जलप्रेमी म्हणून निवड

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

नेहमीच सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण संवर्धन कामात आग्रेसर असणारे स्वच्छता दूत व जलदूत म्हणून ओळख असलेले कोपरगाव येथील गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष आदिनाथ ढाकणे यांची अहिल्यानगर पाटबंधारे विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय जलप्रेमी म्हणून निवड केली आहे. दिवसेंदिवस भुतालावर जलसाठा कमी होत चाललेला आहे यामुळे भविष्यात मोठे पाणी संकट या भुतलावर उद्भवणार आहे तर अनेक जानकारांच्या मते तिसरे महायुद्ध देखील पाणी प्रश्नावरुनच होऊ शकते या सर्व बाबींचा विचार करत जनसामान्यांना पाणी बचती विषयी, काळाची गरज असलेले रेन वॉटर हार्वेस्टिंग विषयी तर देशी वृक्षांची लागवड करत त्याचे संवर्धन करण्याविषयी आदि पर्यावरण संरक्षित बाबींची प्रभावीपणे जनजागृती व्हावी या उद्देशाने शासनाच्या निर्देशानुसार अहिल्यानगर चे जिल्हाधिकारी तथा जिल्ह्याजल साक्षरता समितीचे अध्यक्ष व अहिल्यानगर जिल्हा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता तथा जिल्हा जल साक्षरता समितीचे सदस्य यांनी जिल्ह्यातील १० जलदूतांची जिल्हास्तरीय जलप्रेमी म्हणून निवड केली आहे,यात कोपरगावचे ढाकणे हे गेल्या ३५० आठवड्यापासून कोपरगाव शहरातून वाहणाऱ्या पवित्र अशा गोदावरी नदीची स्वच्छता मोहीम राबवत आहे याच त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची समितीत निवड केली आहे त्यामुळे नक्कीच ही कोपरगावकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे.



**वृक्षांसोबत जलसंवर्धन ही देखील एक काळाची गरज असून प्रत्येक नागरिकांने निसर्गाने दिलेल्या अनमोल देणगीचे जतन करत पाणी जपून वापरत आपल्या परिसरातील नदी,नाले,तलाव स्वच्छ कसे राहतील यावर भर देणे आवश्यक आहे.**
**- आदिनाथ ढाकणे**

# अखेर नगर शिर्डी महामार्गावरील अवजड वाहतूक बंद

**राहुरी : हॅलो प्रभात**



**देवेंद्र लांबे यांच्या मागणीला प्रतिसाद**

नगर शिर्डी महामार्गावर सध्या रस्ता दुरुस्त करण्याचे काम चालू असल्यामुळे महामार्गावर अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक सुरु आहे. एकरी वातुक व त्यात रस्त्याची दुरवस्था या कारणामुळे नगर शिर्डी रस्त्यावर सातत्याने वाहतूक कोंडी होत असते.

नगर शिर्डी महामार्गावर मोठ्याप्रमाणावर अवजड वाहतूक होत असते ,त्यात शिर्डी व शिंगणापूर येथे दर्शनासाठी देश विदेशातून भाविक येत असतात.तसेच महामार्गालगत अनेक साखर कारखाने सुरु झालेले आहेत.महामार्गावरून उसवाहतूक करणारे ट्रक्टर देखील याच मार्गावरून धावत असतात. ऊस वाहतूक करणारे साधनांना वेग अत्यंत कमी असतो.एकरी वाहतुकी मुळे ऊस वाहतूक करणारे साधने या मार्गावर बंद पडल्यास नेहमी वाहतूक कोंडी होत असते.त्यात नाताळ सणाच्या सुट्ट्यांमुळे प्रचंड प्रमाणात वाहतूक वाढलेली आहे.याच विषयावरून रस्ता दुरुस्त कृती समितीचे सदस्य श्री.देवेंद्र लांबे पा. यांनी दि.११ डिसेंबर रोजी मान.जिल्हाधिकारी व मान.पोलीसअधीक्षक यांच्याकडे नगर शिर्डी महामार्गावरील अवजड वाहतूक तात्पुरत्या स्वरुपात बंद करून पर्यायी मार्गाने वळविण्याची मागणी पत्राद्वारे केली होती.

श्री.लांबे-पाटील यांच्या मागणीची दखल घेत पोलीस प्रशासनाने दि.२४ डिसेंबर ते दि.२ जानेवारी २०२६ पर्यंत नगर ते शिर्डी अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. नगर कडून मनमाडच्या दिशेला जाणारी अवजड वाहतूक विळद सर्कल - दुधडेअरी चौक - शेंडी बायपास - नेवासा फाटा - कायगाव टोके - गंगापूर - वैजापूर मार्गे इच्छितस्थळी तर अहिल्यानगर कडून संगमनेर नाशिक कडे जाणारे सर्व अवजड वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग -कल्याण बायपास - आळेफाटा-संगमनेर मार्गे इच्छित स्थळी वाहतूक वळविण्यात आलेली आहे.

## राहुरी पोटनिवडणुकीच्या तयारीला वेग

**राहुरी : हॅलो प्रभात**




राहुरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार कै. शिवाजी कर्डीले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होत असून त्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम २१ अन्वये २२३-राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमात दि. ०१ जानेवारी २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला असून, या तारखेनुसार मतदार यादी अद्ययावत केली जाणार आहे. याअंतर्गत प्रथम टप्प्यात मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण दि. २९ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी एकात्मिक प्रारूप मतदार यादीचे प्रकाशन करण्यात येईल. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांना दावे व हरकती सादर करण्याची संधी देण्यात आली असून, हा कालावधी दि. ०३ जानेवारी २०२६ ते दि. २४ जानेवारी २०२६ असा राहणार आहे. प्राप्त झालेल्या दावे व हरकतींची छाननी करून त्यांचा निकाल दि. ०७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत लावण्यात येणार आहे.

सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २२३-राहुरी विधानसभा मतदारसंघाची अंतिम मतदार यादी दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकाशित करण्यात येणार आहे. या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाचा लाभ घेऊन पात्र नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवणे, तसेच आवश्यक दुरुस्त्या करून घेण्याचे आवाहन निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मी खरा वाघ आहे, त्यांच्यासारखा कागदी वाघ नाही : रावसाहेब दानवे

**जालना : हॅलो प्रभात**

दोन्ही बंधू एकत्र आले चांगली गोष्ट आहे, दोघांनी एकत्र रहावे, एकत्र काम करावे. मात्र, पुढच्या काळात पुन्हा एकदा विभक्त व्हायची पाळी येऊ देऊ नये असे वागा, असा सल्लाच माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी ठाकरे बंधूंना दिला आहे. मुंबईत ठाकरे बंधूंनी आज युतीची घोषणा केली, त्यावेळी रावसाहेब दानवे यांनी केलेल्या टीकेवर पलटवारही केला. ज्यांना पक्षात किंमत उतरली नाही त्यांच्या प्रश्नावर काय उत्तर द्यावं असं उद्धव ठाकरे म्हणाले. तर, उत्तर देवाच्या प्रश्नाला देतात, दानवाच्या नाही असा टोला राज ठाकरेंनी लगावला होता. आता, ठाकरे बंधूंनी खिल्ली उडवलेल्या दानवेंनी पलटवार केला आहे. इकडे युतीची त्यांची प्रेस कॉन्फरन्स चालली आणि दुसरीकडे कार्यकर्ते सोडून चालले. मी बोललेलं त्यांच्या जिव्हारी लागलं, असे म्हणत रावसाहेब दानवेंनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंना लक्ष्य केलं. मी या पक्षात जनता पार्टीपासून काम करतो. या पार्टीने मला सभापती, आमदार, खासदार आणि केंद्रात दोनदा मंत्री केलं. मला राज्याचा अध्यक्ष केलं, हेच नाही माझा मुलगा आज आमदार आहे.

## कोल्हे कारखान्यास 'ग्रीन वर्ल्ड को प्राईड' पुरस्कार

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबददल राज्याचे सहकारमंत्री नामदार बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते पुणे येथे राज्यपातळीवरील 'ग्रीन वर्ल्ड को प्राईड' पुरस्कारांने सन्माननीत करण्यांत आले. संजीवनी उदयोग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांच्यावतींने कारखान्याचे संचालक रमेश आभाळे व ज्ञानेदव औताडे, व्यवस्थापकीय व्यवस्थापक प्रकाश डुंबरे यांनी हा पुरस्कार स्विकारला. सदरचा पुरस्कार माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांना समर्पित करण्यात आला. कार्यकारी संचालक सुहास यादव यांनी संचालक मंडळासह व्यवस्थापनाचे कौतुक केले आहे.

**यात्प्रसंगी राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, सहकार आयुक्त दिपक तावरे, कॉसमॉस बँक बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष मिलींद काळे, बँकेचे अध्यक्ष अॅड प्रल्हाद कोकरे, गौतम ग्रीन वर्ल्डचे अध्यक्ष गौतम कोतवाल यांच्यासह विविध सहकारी संस्था, साखर कारखान्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, प्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते.**

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी अलिकडेच देशाचे सहकारमंत्री, गृहमंत्री नामदार अमित शहा यांच्याहस्ते देशातील पहिल्या बायो सीएनजी व पोटॅश ग्रॅन्युएल खत निर्मीती प्रकल्पाचे लोकार्पण करून सहकार क्षेत्रात नाविन्यपुर्ण कामगिरी करत आपल्या कल्पक नेतृत्वाची चुणूक दाखवुन दिली होती. संजीवनी उदयोग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली विविध रासायनिक उपपदार्थ निर्मीतीबरोबरच औषधनिर्माण क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. उस उत्पादक सभासद शेतक-यांच्या आर्थीक उन्नतीसाठी कारखान्यांने विविध उपाययोजना राबवत थेट शेतक-यांच्या बांधावर या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ऊस उत्पादन वाढीसाठी धडक कृती कार्यक्रम यशस्वीरित्या राबविले आहे., शेतीला पूरक उद्योग दुग्ध उत्पादनाबरोबरच मत्स्यपालनाचे काम मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आले आहे. कार्यक्षेत्रात बांबू लागवडही हाती घेण्यात आली आहे. कारखान्याचे आधुनिकीकरण करत दैनंदिन गाळप क्षमता वाढवत बारमही उद्योगावर भर देण्यात आला आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अभ्यासासाठी करा : छायाताई फिरोदिया

**शिर्डी : हॅलो प्रभात**




अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आभासी दुनियेत न अडकता कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) चा अभ्यासासाठी सकारात्मक वापर करावा, असे आवाहन श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी केले. अध्यक्षस्थानी धनेश स्वामी होते. यावेळी सुमारे १०० विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा आघाव, घनकुटे व श्रीमती आमकर ठाकरे यांनी केले. पारितोषिक यादीचे वाचन संतोष गोर्डे व श्रीमती घोगरे यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून मनोहर लांगी व हांडे यांची निवड करण्यात आली. उच्च माध्यमिक विभागातून चिरंजीव आकाश गायकवाड व कुमारी साक्षी त्रिभुवन यांची आदर्श विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवड झाली. यावेळी एन.सी.सी. विद्यार्थ्यांनी परेड सादर करून मानवंदना दिली. सदर कार्यक्रमासाठी प्राचार्य अभिमन्यू डुबल, उपमुख्याध्यापिका वनिता बोराडे, पर्यवेक्षक शंकर बेलदार व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका आगलावे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू कुसमुडे, एन. पी. जाधव, संजय तमनर, पंडित, कोबरणे, शेख, शेळके, विटणकर, किशोर दळवी, कोळपकर, हातागळे, खटके, पिपाडा आदींनी परिश्रम घेतले.

## तक्रारीपासून न्यायापर्यंत ग्राहकांच्या वाट्याला संघर्षच !

**पुणे : हॅलो प्रभात**

'ग्राहकांना त्यांच्यावरील अन्यायाविरोधात केवळ ऑनलाईन पद्धतीनेच तक्रार नोंदवावी लागते. त्यामुळे त्यांच्या हक्कांची पायमल्ली होते. त्यात ग्राहक हक्क न्यायालयात बसायला, कागदपत्रे ठेवायला जागा नाही. आवश्यक सुविधा नसल्याने न्यायाधीशही त्रस्त आहेत. शासनाच्या उदासीनतेमुळे ग्राहकांच्या वाट्याला तक्रारीपासून ते न्यायमिळेपर्यंत केवळ संघर्ष येतो,' अशी टीका करत ग्राहक पंचायतीचे पुणे महानगराचे अध्यक्ष विलास लेले यांनी पुण्यातील ग्राहक न्याय मंचाच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधले. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त 'लोकसत्ता'शी बोलताना विलास लेले यांनी ग्राहकांच्या अडचणी, त्यांचे हक्क आणि ग्राहक न्याय मंचांच्या दुरवस्थेवर भाष्य केले. २४ डिसेबर १९८६ ला भारतामध्ये ग्राहक हक्क संरक्षण कायदा लागू करण्यात आला. त्यामुळे या दिवशी राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जातो. लेले म्हणाले,'पूर्वी ग्राहकांना त्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरोधात ग्राहक हक्क न्यायालयात प्रत्यक्ष जाऊन दाद मागता यायची. आता केवळ ऑनलाईन पद्धतीनेच तक्रार नोंदवता येते. त्यामुळे ज्यांना मोबाईल, संगणक वापरता येत नाही, अशा ग्राहकांना तक्रार नोंदवताना अनेक अडचणी येतात.

# 'संजीवनी'चे खेळाडू जीत कुणे डो स्पर्धेत प्रथम

**क्रीडा प्रकारांच्या सरावांचे संजीवनीचे फलित**

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंनी जिल्हास्तरीय जीत कुणे डो स्पर्धेत वेगवेगळ्या वयोगटात मार्शल आर्टचे कसब दाखवत प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. यात संजीवनीच्या २० पैकी ११ खेळाडूंची सोलापुर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा कोपरगांव येथिल तालुका क्रीडा संकुलात क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जीत कुणे डो असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात आल्या होत्या. संजीवनी मध्ये सर्व प्रकारांच्या क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण दिल्या जात असल्यामुळे येथिल खेळाडूंना यश प्राप्त होत आहे, अशी माहिती संस्थेने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात पुढे म्हणाले आहे की जीत कुणे डो ही ब्रूसली यांनी स्थापन केलेली एक मार्शल आर्ट आहे, जी कोणत्याही एका शैलीवर अवलंबून न राहता सरळ आणि प्रभावी तंत्रावर भर देते, ही स्व संरक्षणाची प्रणाली आहे, जी परिस्थितीनुसार कोणत्याही मार्शल आर्टमधिल सर्वोत्तम तंत्राचा वापर करण्यास शिकविते. ज्यात विंग चुन, तायक्वांदो आणि बॉक्सिंगचा समावेश आहे. कोपरगांव येथे घेण्यात आलेल्या या स्पर्धेत विविध गटातुन सुमारे २०० पेक्षा अधिक स्पर्धक आले होते.

जीत कुणे डो या स्पर्धेत संजीवनीचे ११ खेळाडू जिल्हा पातळीवरून विभागीय स्पर्धेसाठी पात्र झाले. यात पवन राजीव आरोटे, धिरज आण्णा गायकवाड, खुशल पांडुरंग सदगीर, ओम किरण आहेर, आकाश गणेश कळमकर, आकाश संजय देशमुख, ओंकार गबाजी कांगणे, जयेश बाळुबा महाले, युवराज कानिफनाथ कळमकर, वैभव संपत दिघे व प्रेम माधव चव्हाण यांचा समावेश आहे.



संजीवनीच्या खेळाडूंनी जिल्हा स्तरीय स्पर्धेत केलेली कामगिरी ही त्यांच्या दैनंदिन कठोर सरावाचा आणि चिकाटीचा पुरावा आहे. संस्थेचा सर्व क्रीडा प्रकारांसाठी क्रीडा प्रशिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि शाळेच्या व्यवस्थापनाची क्रीडा संस्कृती वाढविण्याची भूमिका यामुळे उल्लेखनिय यशाचा पाया मजबुत होत आहे, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, विश्वस्त सुमित कोल्हे यांनी सर्व खेळाडू, प्राचार्य कैलास दरेकर व प्रशिक्षक सुदर्शन पांढरे यांचे अभिनंदन केले आहे.